रे.दि.मु.नं.२१८/२०२४

**सांगली येथील मे.सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो,यांचे कोर्टात.**

श्रीमती-सुलोचना पाटील - वादी

वि.

श्री.विशाल नलवडे - प्रतिवादी

**यात वादी तर्फे विनंती अर्ज की,**

सदर कामी मे.कोर्टाने निशाणी ५ कडे ''एकतर्फा तुर्तातुर्त मनाईचा'' आदेश केलेला आहे. सदरचे प्रकरण आज रोजी निशाणी ५ कडील तुर्तातुर्त मनाई अर्जावरील युक्तीवादाकरीता नेमण्यात आलेले आहे. आज रोजी वादी यांचेवर्तीने युक्तीवाद करणेची तयारी आहे. तथापी, उभय पक्षकारांचा युक्तीवाद होवून तुर्तातुर्त मनाई अर्जावर न्यायनिर्णय होणेसाठी काही दिवसांचा कालावधी लागणार आहे. याशिवाय, दावा दाखल तारखेपासून आज अखेरपर्यंत दावा मिळकतीबाबत,''जैसे-थे'' परिस्थिती ठेवणेबाबतचा आदेश अमंलात असून आजअखेरपर्यंत कायम केलेला आहे. त्यामुळे, आज अखेरपर्यंत अमंलात असणारा निशाणी ५ कडील तुर्तातुर्त मनाई अर्जावरील तुर्तातुर्त मनाईचा आदेश होईपावेतो यापुढेही कायम होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदरचा आदेश पुढे कायम न झालेस या वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादी कोणतेही नुकसान होणार नाही.

**तरी मे.कोर्टास नम्र विनंती की,**

सदर कामी आज अखेर पर्यंत कायम असलेला ''तुर्तातुर्त मनाईचा आदेश'' तुर्तातुर्त मनाई अर्जावर पुढील अंतिम न्यायनिर्णय होईपावेतो कायम होवून मिळावा ही नम्र विनंती.

**येणेप्रमाणे विनंती अर्ज असे.**

**सांगली**

**दि.०८/०६/२०२६**

Present today 9/6/26

Bonawane

**वादी तर्फे ॲड.**

O

Perused application. The learned advocate for defendant submitted that he has no objection to extension of stay. Hence, extension of stay is granted till next date.

[signature] 09/06/26